महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २९४ दिनांक १४ / ०६ /२०१०

विषय : अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी विशेष किरकोळ रजा मंजूर करणेबाबत.

.....

उप सचिव, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे परिपत्रक क्र.अपंग-२००८/ प्र.क्र.६८/सुधार-३ दिनांक ११ जुलै २००८ अन्वये अपंग कर्मचाऱ्यांना अपंगांच्या, शासन मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील अपंग विषयक अधिवेशन/संमेलन/प्रशिक्षण/कार्यशाळा यांना उपस्थित रहाण्याकरिता एका वर्षात दहा दिवसांची विशेष किरकोळ रजा मंजूर केली आहे. त्यास अनुलक्षून म.रा.वि.वितरण कंपनीतील अपंग कर्मचारी/अधिकारी यांना अपंगाच्या शासन मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील अपंग विषयक अधिवेशन/संमेलन/प्रशिक्षण/कार्यशाळा यांना उपस्थित रहाण्याकरिता एका वर्षात दहा दिवसांची विशेष किरकोळ रजा मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात शासनाने केलेल्या तरतुदीचा सर्वंकष विचार करून व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून म.रा.वि.वि.वितरण कंपनीमधील अपंग कर्मचारी/अधिकारी यांना अपंगाच्या शासन मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील अपंग विषयक अधिवेशन/संमेलन/प्रशिक्षण कार्यशाळा यांना उपस्थित रहाण्याकरिता एका वर्षात दहा दिवसांची "विशेष किरकोळ रजा" मंजुरीचा निर्णय घेतलेला आहे ही विशेष रजा सदर शासन परिपत्रक निर्गमित झालेल्या तारखेपासून म्हणजेच दि.११ जुलै २००८ पासून खालील शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येईल.

१) म.रा.वि.वि.कं.मर्या.मधील अपंग कर्मचारी/अधिकारी यांना अपंगाच्या शासन मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील अपंग विषयक अधिवेशन/संमेलन/प्रशिक्षण कार्यशाळा यांना उपस्थित रहाण्याकरिता एका वर्षात दहा दिवस "विशेष किरकोळ रजा" अनुज्ञेय राहील. मात्र ही रजा पुढील वर्षाकरिता साठविता येणार नाही.

२) "विशेष किरकोळ रजा" ही कोणत्याही एका कॅलेंडर वर्षामध्ये एकूण १० दिवसांपेक्षा जास्त होता कामा नये.

३) विशेष किरकोळ रजेच्या काळात येणारी साप्ताहिक सुट्टी, रविवार, सार्वजनिक सुट्टया आणि/किंवा दुसरा व चौथा शनिवार यासारखे सुट्टयांचे दिवस विशेष किरकोळ रजेच्या हिशोबात धरण्यात यावेत. तथापि, रजेला लागून किंवा रजेच्या पुर्वी येणाऱ्या सुट्टीचे दिवस विशेष किरकोळ रजेच्या हिशोबात घेण्यात येऊ नयेत.

४) निरनिराळया संवर्गातील कर्मचाऱ्यांना सरासरी वेतनी रजा आणि अर्ध सरासरी वेतनी रजा मंजूर करण्यास सक्षम असलेले अधिकारी "विशेष किरकोळ रजा" मंजूर करण्यास सक्षम असतील.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु. य पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.

*D:\O&M\Adm.Cir.F.N.9-10 day Leave for Handicap Assembly.doc*